ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51


आम्ही ५१ !

गोष्ट क्र. ८

२१ फेब्रुवारी २०२१

***मिलिंद काळे***

***(१९७० - ७७)***



मला माझ्या वर्गातल्या मित्रांबरोबरच्या गप्पा–गोष्टींमधून जे वैचारिक दृष्टीकोन मिळत गेले त्याचा खूप उपयोग होत गेला. या एकीमुळेच एक खूप मोठा पाठिंबा मिळायचा. या सातत्याने एकत्र राहण्याचा उपयोग, आपल्या कामांमध्ये आणि कार्यक्षेत्रामध्ये पुढे जाण्यासाठी नक्की होतो.

कुठल्याही क्षेत्रात नेतृत्व करताना सगळ्यांना बरोबर घेऊन चालायला हवं, विविध विचारधारा संघटित करायला हव्यात. समविचारी गट तयार करणे आणि सहविचारात्मक नेतृत्व हे प्रबोधिनीनेच शिकवलं. आणखी एक मुख्य बाब म्हणजे काम हे नैतिकतेने आणि प्रामाणिकतेने व्हायला हवं. वेळप्रसंगी आपण एकटे पडलो तरी बेहत्तर पण जे ध्येय ठरवलं आहे तिथपर्यंत आपल्या सहकाऱ्यांना घेऊन बरोबर चालायला हवं.



jpp51_51@jnanaprabodhini.org

### शिशुनिकेतन ते नू. म. वि. ते ज्ञान प्रबोधिनी

माझं तिसरी पर्यंतचं शिक्षण शिशुनिकेतन नावाच्या एका घरगुती शाळेत झाले आणि चौथीमध्ये मी नू.म.वि.मध्ये गेलो. शिशुनिकेतन सारख्या घरगुती वातावरणाच्या शाळेतून नू.म.वि. सारख्या शाळेत जाणे हा माझ्यासाठी एक खूप मोठा बदल होता. तिथे चालणारे शिष्यवृत्ती वर्ग आणि निमोणकरसर आजही आठवतात. त्यापेक्षा वेगळे वातावरण मला प्रबोधिनीत असल्याचे जाणवले. आ. वामनराव आणि माझ्या वडिलांच्या असलेल्या परिचयामुळे माझी प्रबोधिनीशी ओळख झाली. आ. वामनरावांच्या आग्रहामुळे माझ्या वडिलांनी मला सांगितलं की पुढचं शिक्षण तू प्रबोधिनीत घ्यायचं आहेस आणि त्यादृष्टीने तयारी कर. अशाप्रकारे प्रशालेची परीक्षा देऊन मी प्रबोधिनीत दाखल झालो. ही सगळी प्रक्रिया म्हणजे खूप कमी काळातील मोठी स्थित्यंतरे होती. नू.म.वि. सारख्या आठ तुकड्या आणि प्रत्येक तुकडीत ८० ते १०० मुले असणाऱ्या मोठ्या संख्येच्या शाळेमधून अचानक फक्त वीस जणांच्या एका वर्गात, हा बदल फार मोठा होता. आता शाळेतल्या प्रत्येकाशी आपला वैयक्तिक दुवा जोडला जाणार आहे, आपल्यावर प्रत्येकाचे लक्ष असणार आणि आपल्याला सगळे वेळ देऊ शकणार आहेत हे काहीतरी वेगळं होतं आणि मला खूप नवीन होतं, त्यामुळे त्याचं अप्रूप होतं. सुरुवातीला त्याचा उपयोग कळला नाही मात्र आता त्या शिक्षण पद्धतीमध्ये असलेला बदल चटकन लक्षात येण्याजोगा आहे. कालांतराने आता अशा अनेक संस्था उभ्या राहत आहेत. आज २०–२५ मुलांची संख्या आणि त्यामागे एक शिक्षक अशी रचना येते आहे मात्र त्याकाळात आमच्यावेळी फक्त वीसच मुले निवडून त्यांच्या घडणीसाठी प्रयत्न करणे हे प्रबोधिनीचे काम खूपच वेगळे आणि चांगले होते. त्यावेळेचे शिक्षणातले जे प्रयोग झाले ते किती चांगले होते हे पुढे आम्हाला जाणवत गेले. पाचवीमध्ये ते कळले नाही मात्र आज समजत आहे. खूप लक्षात असलेलं म्हणजे आपण प्रबोधिनीमध्ये म्हणत असतो की वर्गातील शिक्षण (classroom education) आणि प्रत्यक्ष शिक्षण (field education) ह्यात खूप फरक आहे. **प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीमधले वर्गातले शिक्षण आणि त्यासोबतच पुस्तकांपेक्षा जास्त महत्त्व हे मैदानावरच्या आणि अवांतर शिक्षणाला दिलं गेलेलं आहे आणि सोबत उरलेल्या माध्यमातून जे शिक्षण मिळतं त्याच्यातूनच खरे आपण तयार होतो असे मला वाटते.** मला त्याची प्रचिती आणि अनुभव आजही येतात!



मला आठवतंय की प्रबोध विभाग किंवा ज्याला आपण मैदान असे म्हणतो तिथे मनुष्य कळणे, परिस्थितीचे आकलन होणे, त्याचे अवलोकन करणे, परत दुरुस्त करणे आणि पुन्हा त्यावर निर्णय घेणे ही प्रक्रिया कळली. मैदानासोबतच अशा प्रकारचे शिक्षण हे सहलींमधून झाले. खरा मी किंवा आपल्यातला प्रत्येकजण घडला तो सहलींमध्ये किंवा शिबिरांमध्ये!

### गटकार्य आणि जोडीकार्यातून घडण

आमच्यावेळी वैयक्तिक कार्य, जोडीकार्य, गटकार्य दिली जात असत आणि आजही शिबिरांमध्ये ती दिली जात असतील. ही सर्व कार्ये योग्यप्रकारे विचारपूर्वक निवडलेली असायची आणि त्याचे परीक्षण केले जायचे आणि काय चुकले, काय बरोबर आले हे सांगितले जायचे. पुस्तकी शिक्षणाबरोबरच मैदानावर जे मनुष्यघडणीचे शिक्षण दिले जायचे त्यातील हे बारकावे मला महत्त्वाचे वाटतात. **मला आठवीत असताना हिवाळी शिबिरात वैयक्तिक कार्य म्हणून पूर्ण रात्रभर थंडीत एकट्याने कात्रजच्या घाटाच्या तोंडाजवळ थांबून रात्री ८ ते सकाळी ८ पर्यंत किती आणि कुठली वाहने गेली ह्याची नोंद घ्यायची आणि सकाळी येऊन प्रशालेत निवेदन करायचे असे कार्य दिले होते. ते आत्ता सांगायला आणि ऐकायला खूप सोपे वाटेल मात्र चाळीस वर्षांपूर्वी पुणे छोटे शहर होते आणि रस्त्याला दिवे फारसे नसताना वय वर्ष १३–१४व्या वर्षी असे कार्य एकट्याने केल्यावर मनातील भीतीच निघून गेली. आयुष्यात त्यानंतर पुन्हा कधी माझ्या मनात भीती राहिली नाही आणि कुठलेही प्रसंग आले तरी तोंड देता आले. त्यावेळेला रात्री पुण्यामध्ये असलेली बैठक संपवून मोहनराव अकरा वाजता स्कूटरवर मी तिथे पोहोचलो आहे की नाही? मी जागा आहे की झोपलो आहे? प्रत्यक्ष घाटात आलोय की प्रबोधीनीत नोंद करून केवळ पुण्यातच बसून वहीत नोंदी घेतल्या हे पहायला रात्री ११.३०–१२.०० वाजता तिथे आले होते.** सोपवलेलं काम ती व्यक्ती पूर्ण करत आहे की नाही आणि त्यामध्ये त्याच्यामधील क्षमता विकसित होणं हे महत्त्वाचे

होते. त्याचे कौतुक होणं हा छोटा विषय झाला. पण ह्या कार्यामध्ये आपल्याबरोबर कोणी नसताना निर्भयपणे काम पूर्ण करायचे ही मोठी शिकवण मला मिळाली.

माझे वर्गमित्र किशोर पाटील हे पण माझ्याच बरोबर सी.ए. झाले. त्यानंतर पुण्यातील नामवंत फर्ममध्ये ते रुजू झाले. त्यानंतर आय.टी. विंगमध्ये काम सुरू केले आणि गेली २५ वर्षे झाली ते KPIT चे सर्वेसर्वा आहेत. त्यांना आणि मला जोडीकार्य दिलेले मला आठवते. पुण्यातील आपल्या वास्तूमधून मी सिंहगडावर जायचे आणि मी कुठल्या वाटेने गेलो हे त्याने शोधायचे असे त्या हिवाळी शिबिरातील कार्य होते. मी कुठल्या रस्त्याने गेलो हे मागच्याला समजता कामा नये आणि तुझ्यावर कोणीतरी लक्ष ठेवणार आहे आणि तुला कुणालाही न कळता सिंहगड चढायचा आहे असे मला संगितलेले होते. त्यामध्ये ज्यावेळी आम्हा दोघांना समजलं की आम्ही एकमेकांच्या मागावर आहोत आणि पाठलाग करत आहोत तेव्हा पुण्यातच आमची स्पर्धा सुरू झाली. माझ्याकडे एक सायकल होती आणि किशोरकडे एक सायकल होती. मी खेड-शिवापूर कडून जातोय की डोणजे कडून जातोय हेच कळू नये म्हणून एकमेकाला चुकवायला आणि गंडवायला स.प. महविद्यालयाच्या इथल्या विजय नगर कॉलनीतूनच आम्ही सुरुवात केली. संपूर्ण एपिसोड असाच सुरू राहिला आणि आम्ही गडावर गेलो. आम्ही एकमेकांना चुकवू शकलो नाही, आम्ही गडावर भेटलो आणि पुन्हा वास्तूत आल्यावर एकमेकांना कथन केलं. ह्या अनुभवातून सगळ्यांची नजर चुकवून काम करणे किती अवघड आहे हे समजले. आपल्या देशाचा लष्कराचा हेर जेव्हा परदेशात जात असेल तेव्हा सगळ्यांच्या आड राहून सगळ्या गोष्टी कशा करत असेल याचा विचार आला. अशी आमची मानसिकता त्यावेळी घडत गेली हे फार महत्त्वाचे आहे असे मला वाटते. मैदान आणि शिबिरांत अशाप्रकारे जे शिक्षण झाले त्याचा आजही दैनंदिन कामामध्ये मला उपयोग होतो आहे.

**हम सात साथ-साथ**



वेल्ह्यामध्ये आमची पावसाळी सहल तोरणा गडावर जाणार होती. सुदर्शन हसबनीस यांचे वडील लष्करात असताना त्यांना चीन युध्याच्या वेळी कैद देखील झालेली होती व त्यातून ते सुटले. अशा सैन्याची पार्श्वभूमी असणाऱ्या कुटुंबातून आलेला मुलगा असल्याने त्याच्या आमच्या विषयीच्या आणि आमच्या त्याच्या विषयीच्या कल्पना फार वेगळ्या होत्या. मात्र तोरणा सहलीमध्ये बोलताना जाणवले की आम्हाला पाचवी ते सातवी जे ट्रेकिंगचे अनुभव आले ते त्याच्याजवळ नव्हते. त्याने ट्रेकला लष्कराप्रमाणे मोठा पसारा सोबत आणलेला होता आणि तोरणा गडाच्या शेवटच्या टप्प्यात जिथे दोर धरून जायला लागते तिथे त्याचे निम्मे सामान मी माझ्या पाठीवर घेऊन चढलो होतो. कुठल्या ठिकाणी जाण्यासाठी काय तयारी असावी आणि किती तयारी असावी हे शिकण्यासारखा अनुभव आम्हा दोघांनाही मिळाला. अशा अनुभव शिक्षणामधून आम्ही शिकत गेलो. आमचा वर्ग म्हणजे कॉमर्सचे शिक्षण घेऊन अकरावीमध्ये शालांत परीक्षा देणारा शेवटचा वर्ग. आम्ही एकूण सात जण कॉमर्सला गेलो त्यामध्ये मी, पुरुषोत्तम राठी, महेश आठवले, किशोर पाटील, शिरीष जोशी, शशांक चांदोरकर आणि विनायक हळबे, अशा सात जणांनी प्रायोगिक तत्त्वावर कॉमर्सचे शिक्षण घेतले. त्यावेळी पुरेसे शिक्षक उपलब्ध नसताना स्वाध्यायाची लागलेली गरज आणि शिक्षकांवर अवलंबून न राहता स्वत: काम करता येण्याचे तंत्र ह्याचा पुढे सी.ए.च्या शिक्षणामध्ये आम्हा सर्वांनाच खूप उपयोग झाला. त्यामुळे प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीबद्दल आपण बोलतो त्यावेळी आपण अशा परिस्थितीमधून शिकत जाणे आणि नवीन-नवीन परिस्थिती अंगावर टाकणे हीच एक प्रकारची कार्यप्रणाली आहे आणि चाकोरी बाहेर जाऊन ही कार्यप्रणाली प्रबोधिनीने अंगिकारली. त्याच्यामधून आपण सर्वजण घडलो.

आम्ही तर अभिमानाने सांगतो, आमच्या वर्गातून विविध क्षेत्रांतील चांगले काम करणारे लोक तयार झालेत. डॉ. धनंजय केळकर आमच्याच वर्गाचे. त्याची एक आठवण सांगायची तर कोल्हापूर जवळील पंचगंगा सहकारी साखर कारखाना आहे. तिथल्या ग्रामीण भागातील मुलांना शहरात शिकवण्यासाठी म्हणून आप्पांनी तिथल्या चेअरमन आणि त्यावेळच्या सहकार क्षेत्रातील खूप मोठे महर्षी रत्नाप्पाआण्णा कुंभार ह्यांच्याशी संपर्क केला. **'बिना संस्कार नही सहकार, बिना सहकार नही उद्धार' हे रत्नाप्पाआण्णा कुंभार ह्यांचे ध्येयवाक्य !! त्यांच्याशी बोलून पाच मुले आप्पांनी प्रबोधिनीत वसतीगृहात शिकायला आणली. त्या पंचगंगा सहकारी साखर कारखान्यामुळे तेथील परिसराचा सर्वांगीण विकास कसा झाला ह्याचा अभ्यास करायला नववीमध्ये असताना मी आणि धनंजय केळकर गेलो होतो. आम्ही त्या परिसरात आठ-दहा दिवस राहून**

**एखादा उद्योग आला तर त्याच्यामुळे आजूबाजूला काय प्रक्रिया घडतात आणि त्याचे कसे फायदे होतात याचा अभ्यास केला. हे आजही मला बँकेचे काम करत असताना, आजूबाजूची परिस्थिती समजून घेताना आणि साखर उद्योग समजून घेताना उपयोगाचे ठरते.** सातवी ते नववी असे जे प्रकल्प केले त्याचा मला खूप उपयोग झाला.

## सभ्य गुंड व्हा

आम्हाला आप्पांचा सहवास इतका लाभला की जवळपास प्रबोधिनीचे वातावरण हे गुरुकुलप्रमाणेच वाटायचे. मी रहायला शुक्रवार पेठेत होतो. पाचवीमध्ये असताना कळायला लागल्यापासून सकाळी उठायचे आणि प्रबोधिनीत यायचे नित्याचे झाले होते. माझा सहकारी किशोर पाटील तर जोंधळे चौकात रहायचा तरी सकाळी सात वाजता प्रबोधिनीत यायचा आणि आम्ही रात्री आठ वाजताच घरी जायचो. आप्पांबरोबर येणारे लोक, त्यांच्यासोबत होणारा संवाद, किती विविध लोकांशी आप्पा द्रष्टा म्हणून बोलतात हे आम्ही प्रत्यक्ष पहात होतो. आप्पांसोबत आम्ही खेळलो बागडलेलो आहे. आम्हाला आप्पांची भीती वाटायची नाही. त्यांच्या शिकवण्याच्या अनेक आठवणी निश्चित आहेत मात्र त्यातील एक गोष्ट त्यांनी सांगितलेली अनुभव म्हणून सांगतो. **आप्पांनी सांगितले होते, की मला 'सभ्य गुंड' पाहिजेत! मला तुम्ही 'सभ्य गुंड' व्हायला हवेत! आप्पांना गुंड म्हणजे काय असतं आणि गुंडांना उत्तर हे गुंडानेच द्यायचे असते त्यामध्ये माझा मुलगा गुंडगिरीमध्ये कमी पडायला नको हे कळत होतं आणि तो केवळ गुंडगिरी करणारा गुंड नसावा तर तो 'सभ्य गुंड' असावा! हे दोनच शब्द. मात्र चाळीस वर्षांपूर्वी हे त्यांनी सांगणं आणि आज आप्पांचा ती 'सभ्य गुंड' ही संकल्पना वाखाणण्याजोगी आहे. हा 'सभ्य गुंड' आम्हाला त्यावेळी जो दिसला, कळला, समजला त्याचा खूप उपयोग झाला.** प्रबोधिनीला चतु:शृंगीपाशी, वांद्रेकर बाग म्हणून व कोथरूड मधली काही जागा देणगी मिळालेल्या होत्या तिथे काहींनी अतिक्रमण केले होते. अशावेळी त्या जागा परत मिळवण्यासाठी जी काही कामे केली त्यामध्ये आम्ही काम केलेलं होतं आणि मग सभ्यपणा असतानासुद्धा आपली हक्काची वस्तू मिळवण्यासाठी आपण गुंडगिरी करू शकलो पाहिजे नाहीतर तो नुसताच सभ्य झाला ही दृष्टी आमच्यात योग्य वयात रुजवण्याचे महत्त्वाचे काम आप्पांनी केले. त्याचा आम्हाला निश्चितच आजसुद्धा उपयोग होतो. मी आज सहकार क्षेत्रामध्ये आहे. सहकार क्षेत्रामध्ये गुंडगिरी चालतेच आणि राजकीय लोकांचे प्रभाव असतातच पण अशावेळी कशालाही भीक न घालता, न घाबरता त्यांना पुरे पडणे हे फार महत्त्वाचे आहे. अशा गुंड प्रवृतींना पुरून उरण्यासाठी गुंड असणे चूक नाही हे आम्हाला त्याचवेळी शिकवले गेले असल्याने सहकार क्षेत्रात निवडणुका आल्या की दर पाच वर्षांनी मी अशा काही गुंडांना सामोरे जातो, त्यावेळी मग कॉसमॉस सारखी मोठी संस्था ताब्यात घ्यायला जे-जे लोक तत्पर होतात त्यांना त्याच जागी ठेचून काढण्याचे काम मी तीन वेळा करत आलो आणि ह्यावेळी देखील पुन्हा करून दाखवलं! चांगलं आणि वाईट यातला फरक करता येणं आणि त्यावर आवश्यक कृती करायला आम्हाला प्रबोधिनीने शिकवले.

## प्रयोगातून समाजदर्शन

आमच्या वर्गावर खूप प्रयोग झाले. शिवापूर यंत्रशाळेच्या उद्घाटनाच्या वेळी त्या कॅम्पमध्ये शिबिरात आम्हाला तिथे थंडीत दलाच्या गणवेशात बनियनवर बसवलेले होते. त्या कॅम्पमध्ये आत तंबू आणि रात्री त्याला आठ-आठ तासाच्या पाळीने पहारा देणं, ही मी १९७२ सालची गोष्ट सांगतोय. शिवचरित्र ऐकताना 'जागता पहारा' देणं ऐकलेले होते त्याचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे मोकळ्या मैदानावर कुणी श्वापद नाही, माणूस नाही हे पाहण्याकरता आळीपाळीने काम म्हणजे job rotation आम्ही तिथे शिकलो. आज अगदी लष्करात, मोठ्या कंपनीत किंवा बँकेत जे job rotation असतं ते मी वयाच्या १२व्या वर्षी ७२ साली हिवाळी शिबिरात शिकलो. **१९७२ सालीच महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता आणि आम्हाला सिंहगडाच्या कल्याण दरवाजा ते शिवगंगा खोऱ्याचा अभ्यास करण्यासाठी म्हणून मी खोऱ्यातील रांझे गावच्या पाटलांच्या घरी राहिलो होतो आणि पूर्ण रांझे आणि कल्याण गावचा अभ्यास केला होता. ज्या खोऱ्यात धो-धो पाऊस पडतो तिथे दुष्काळ का पडतो आणि ती परिस्थिती पुन्हा उद्भवू नये म्हणून काय करायला लागेल ह्याचा अभ्यास वयाच्या बाराव्या वर्षी मी केला. आज बँकिंग क्षेत्रात काम करताना पाणी आणि त्याभोवतीचे धागे आणि 'पुढचे विश्वयुद्ध हे पाण्यामुळे उद्भवणार आहे' म्हणजे नक्की काय? त्यावर काय करायला पाहिजे ह्याची जाणीव ठेवू शकतो कारण त्यावेळी आम्ही प्रत्येक घरात जाऊन आम्ही बसलो. आम्हाजवळच्या असलेल्या प्रश्नावली आम्ही भरून घेतल्या. रांझे-कल्याणच्या लोकांसाठी तुम्ही करता काय? उत्पन्नाचे साधन काय? पुढे काय करणार? असे प्रश्न आम्ही विचारले आणि त्यामधून आलेल्या निरीक्षणाच्या**

**आधारे पूरक उद्योग पाहिजे हे शिकलो.** आजही आपण पाहतो कोविडच्या काळात जे एकाच उद्योगावर अवलंबून न राहता पूरक उद्योग करत होते त्यांनी निभावून नेलं. भारताने शेती किंवा उद्योग किंवा सेवा या सारख्या एकाच क्षेत्रावर अवलंबून न राहता पूरक उद्योग केले पाहिजेत हे त्यावेळी लक्षात आले.

**वाडियातला प्रवेश – वेगळ्या जगाचे दर्शन**

१९७७ साली जून महिन्यात निकाल लागला आणि त्यावेळेला प्रबोधिनीतून जो विद्यार्थी पास झाला त्याला प्रीडिग्रीची परीक्षा द्यायला लागली नाही आणि बारावीची परीक्षा देखील द्यायला लागली नाही. हे फक्त आमच्या कॉमर्सच्या मुलांसाठीचे होते. ११+४ किंवा १०+२+३ अशा अभ्यासक्रमातून आम्ही सातजण अपवादात्मक रीतीने वाचलो आणि सीबीएसई ११वी पास झाल्यामुळे आमचे एक वर्ष वाचले. पण त्यावेळी आम्ही पी.डी. किंवा बारावी देखील पास झालेलो नाही हे पटवून देऊन आम्ही पुणे विद्यापीठाच्या प्रवेशासाठी जंग-जंग पछाडले तरी कुठेही प्रवेश मिळाला नाही. महेश आठवलेचा बीएम्सीसी चा अपवाद सोडता आम्ही उर्वरित सहा जण नेस वाडिया कॉलेजमध्ये गेलो आणि व. कृ. नूलकर सरांनी तिथे आम्हाला मदत केली. आजचे वाडिया आणि त्यावेळचे वाडिया यात बराच फरक होता. उभरत्या वयात ज्ञान प्रबोधिनी सारखे संस्काराचे ठिकाण हे एक टोक आणि वाडिया म्हणजे महाविद्यालयीन जीवनात वेगळ्या प्रकारची संस्कृती असणारे महाविद्यालय म्हणजे दुसरे टोक. मी भयानक किंवा विचित्र म्हणत नाही पण वेगळ्या प्रकारच्या वातावरणात जाण्याचा हा मोठा बदल आम्हाला पचवायला लागला. जुलैमध्ये निकाल लागल्यावर एक वर्ष वाचवण्यासाठी म्हणून प्रवेशासाठी दोन-तीन महीने टाचा झिजवल्या पण काही हाती लागलं नाही. नूलकर सरांनी नियमावर बोट ठेवून केवळ प्रवेश देता येतो म्हणून प्रवेश दिला आणि आनंदी होऊन आम्ही तेथील वेगळ्या वातावरणात गेलो. मी वाईट म्हणणार नाही पण प्रबोधिनीपेक्षा वेगळ्या प्रकारचे वातावरण तिथे होते. तिथेही आम्ही आमच्या विचाराचे समविचारी लोक शोधले आणि त्यांच्याबरोबर आम्ही वाढत गेलो. प्रबोधीनीमध्ये आठवी-नववीमध्ये असताना सर्व धर्म समजून घेण्यासाठी वर्गात गट करण्यात आले होते आणि आम्ही त्याचा अभ्यास केला. मात्र आम्ही त्याचा फक्त अभ्यास केला, प्रत्यक्ष शिकलो नाही. त्यामुळे आम्हीही सगळ्या लोकांच्यात मिसळत नाही अशी समस्या होती. मात्र वाडियामध्ये गेल्यावर न घाबरता त्यांच्यात मिसळणे हे गरजेचे होते आणि जगात काहीही टाकाऊ नाही हे समजून घेता आले. आपण असे इतरांच्यात जाऊन त्यांच्यात मिसळूनही वेगळे राहू शकतो हे समजून घ्यायला हवे. माझ्याहून वेगळे विचार-आचार असणारा व्यक्ती देखील काही अजेंड्यावर एकत्र काम करताना माझा सहकारी होऊ शकतो. त्यामुळे आपण प्रबोधिनीमध्ये फार कोशात वाढतो. आप्पांचे प्रयत्न नक्की असायचे की आम्ही इतरांच्यात मिसळावे आणि त्यासाठी आप्पांनी वास्तूत परदेशी मुलांना राहायला बोलायचे आणि त्यानंतर एकमेकांच्या संस्कृतीचा अभ्यास व्हायचा मात्र त्यावर काम पुढे झाले नाही फक्त अभ्यास स्तरावर गोष्टी राहिल्या. त्यामुळे दैनंदिन स्तरावर रोजच्या जीवनात समजात मिसळणे व्हायला हवे. प्रबोधिनीने सर्वमान्य होण्यासाठी ज्या गोष्टी लागतील ते आपण केले पाहिजे.

तिथे आम्हाला लक्षात आले की सी.ए. परीक्षा B. Com होऊन देण्याची त्यावेळची जी पद्धत होती त्याऐवजी entrance exam देऊन देखील देता येते आणि आम्ही पहिल्या सहा महिन्यातच परीक्षेला बसलो आणि आम्ही सर्वजण entrance exam देऊन गेलो म्हणून तिथेही आमचा वेळ वाचला. त्यामुळे परिस्थिती प्रतिकूल असताना देखील आम्ही आमची चांगली संगत शोधली आणि आम्हाला तिथे चांगले गुरू भेटले. अतिशय धार्मिक वातावरणातले नुलकर सर तिथे प्राचार्य होते ते भेटले. त्यांनी आम्हाला योग्य मार्गदर्शन केले आणि आम्ही चांगल्या संधी शोधत गेलो.

महाविद्यालयात असताना १०वी आणि ११वीमध्ये मी शाळेचा प्रतोद होतो. मी बदलाच्या वर्षी तिथे असल्याने सगळ्यात भाग्यवान की मला दोन वर्ष प्रबोधिनीमध्ये नेतृत्वाची संधी मिळाली. वाडियामध्ये असताना देखील मी प्रबोधिनीमध्ये येऊन दलाचे काम करत होतो. त्यावेळी दगडूशेठ हलवाई गणपती समोर आपले पथक आणि त्याचा सलग नववी-ते महाविद्यालयाचे तृतीय वर्ष मी प्रमुख म्हणून काम केले त्यामुळे चांगल्या लोकांशी चांगला संपर्क राहिला. त्याचा महाविद्यालयीन जीवनात फार उपयोग झाला.

**आंध्र वादळ मदतकार्यात झालेले जीवनदर्शन**

याच काळात १९७७च्या डिसेंबरमध्ये आंध्र प्रदेशमध्ये सर्वात मोठे चक्रीवादळ झाले आणि त्यामध्ये मोठी मनुष्यहानी झाली. त्यावेळी सकाळी ती बातमी आल्यानंतर प्रबोधिनीमध्ये फलक लावला होता की ज्या कुणाला मदतकार्यात कार्यकर्ता म्हणून जायचं असेल त्यांनी आज रात्री गोळा व्हायचं आहे. हे आम्हाला सहा वाजता कळले आणि रात्री नऊ वाजता आम्ही

रेल्वे स्थानकावर होतो. आम्ही एकूण वीसजण आणि कसबा पेठेतील शिवसेनेचे काही कार्यकर्ते असे एकत्र वादळानंतर मदतकार्य करण्यासाठी गेलो होतो. मोहनराव आमच्या बरोबर होते आणि अविनाश धर्माधिकारी होता. ज्या वयात एखादा मनुष्य पुण्यात स्मशानभूमीत  देखील जाणार नाही अशा वयात त्या परिस्थितीमध्ये तिथे आजूबाजूला आम्ही ज्या पाच गावांमध्ये गेलो होतो तिथे शेकडो माणसे आणि जनावरे मरून पडली होती आणि सर्वत्र स्मशानच दिसत होते. मी आणि अविदा आम्ही दोघांनी कमीतकमी २०-२५ मृतदेह गोळा करून एका ठिकाणी नेऊन रॉकेल वर जाळलेले होते. 'होत्याचे नव्हते' म्हणजे काय हे जे माणसाला शिकायला, कळायला पाहिजे ते मला उमगले. मी फार अध्यात्मातला नाही मात्र मृत्यूनंतर होत्याचे नव्हते होणे म्हणजे काय आणि ते होऊ नये म्हणून आधी काय करायचे हे वयाच्या सोळाव्या वर्षी मला अनुभवायला आले. काठ्या तोडून घेतलेले दोन बांबू आणि अंगातला शर्ट काढून, डाव्या हाताच्या बाहीमध्ये एक आणि दुसऱ्या हाताच्या बाहीमध्ये दूसरा बांबू लावून मध्ये बटणे लावणे असे एका बाजूने माझा शर्ट आणि दुसऱ्या बाजूने अविनाशचा शर्ट अशी झोळी करून आम्ही प्रेत उचलायचो. त्या परिस्थितीत आजूबाजूचे लोक आम्हाला सांगायचे हा वाडा सावकाराचा होता, हा गावातला मोठा माणूस होता, याची मोठी बाग होती, याचा मोठा उद्योग होता आणि आता सामोर काय उद्ध्वस्त झालेले आहे हे आम्ही डोळ्यांनी पाहत होतो. चार-पाच दिवसांनंतर आणखी लोक पुण्यावरून आले, कपडे आणण्यात आले त्याचे वाटप आम्ही सुरू केले. पुण्यातून आलेल्या पैशाने आम्ही विजयवाडा शहरातून ट्रक भरून सामान खरेदी केले. खाद्य पदार्थ, कपडे, भांडी असे वाटप मी वयाच्या सोळाव्या वर्षी केले. येणाऱ्या कुठल्याही प्रसंगात आपणच मार्ग काढायचा असतो आणि आपल्याशिवाय कोणी नसतं हे केवळ मला प्रबोधिनीमुळे शिकायला मिळाले. ह्या मदतकार्यात आम्हाला सकाळी फक्त चहा आणि पाव मिळायचा, तो खाऊन आम्ही कामाला बाहेर पडायचो. सकाळी जागेवर कोरडं जेवण आणि रात्री थोडं जेवण असायचे. **आंध्रमध्ये तिथे छोटी सोनकेळी असायची ती आमच्यासाठी कपाटामध्ये आणून ठेवलेली होती. एक दिवस त्या कपाटातील काही केळी कमी झाली म्हणून त्याच दिवशी संध्याकाळी आम्हाला गच्चीवर एकत्र बोलावले. मोहनराव म्हणाले,  कपाटातील केळी कमी झाली आहेत व ती कमी का झाली आहे हे कोणी सांगत नाही आणि स्वत: कबूल करत नाही तोपर्यंत आजचे संध्याकाळचे जेवण नाही. त्याच दिवशी म्हणजे १३ डिसेंबर १९७७ रोजी माझा सतरावा वाढदिवस होता. मी आयुष्यात कधीच विसरू शकत नाही की त्या दिवशी संध्याकाळी ती केळी कोणी गायब केली हे कबूल न झाल्याने आम्हाला सर्वांना शिक्षा म्हणून उपाशी रहायला लागलं. माझ्या १७व्या वाढदिवसाला अशाप्रकारे आम्ही सर्व उपाशी राहिल्यापासून आयुष्यात नंतर वाढदिवस साजरा करणं किंवा न करणं यात मला आता काहीच फरक वाटत नाही. तो वाढदिवस जो मी पाहिला आहे त्यामध्ये खूप मोलाचे शिक्षण झाले. वाढदिवस का असतो आणि त्याचा कसा विचार करावा याच्या माझ्या मनातील पूर्ण मूलभूत संकल्पनाच या अनुभवातून पार बदलून गेल्या.** आपल्या सहकाऱ्यासोबत विकासाचा अभ्यास करणे आणि होत्याचे नव्हते अनुभवणे या सगळ्या प्रकारच्या गोष्टींमधून मला आलेल्या प्रचितीची फळे मी आजदेखील उपभोगत आहे. अडचणीच्या प्रसंगात लोक हातपाय गाळतात त्यावेळी मी आजही उभा राहतो याचा मला आणि कॉसमॉस बँकेला निश्चित उपयोग झाला. मला पूर्ण प्रबोधिनीनेच घडवले असेच मी सांगेन!

एक वेड डोक्यात घेतलं की काही करणे अशक्य नसते हे आम्ही प्रबोधिनीत शिकलो आणि त्याचा एक छंदच लागला होता. सी.ए. झाल्यावरही हे पुरेसे नाही आणि आणखी शिकले पाहिजे, पूरक शिक्षण घेतले पाहिजे असे आम्हाला वाटत होते. त्यावेळेला आम्ही ICWA चा कोर्स केला. एक कोर्स करायला B. Com झाल्यावर लोकांना पाच-पाच, सात-आठ वर्षे लागायची आणि मग ते सी.ए. व्हायचे अशावेळी आम्ही सी.ए. होऊन ICWA चा कोर्स करणे हेदेखील एक नावीन्यपूर्ण होतं आणि वेगळं होतं. आमच्या बँकेचे संचालक प्रमोद पारखी त्यावेळी ते ICWA चे एक सक्रिय सदस्य होते आणि नंतर ICWA चे प्रमुख झाले होते त्यांनी मला याची गोडी लावली. केवळ सी.ए. हा एक कोर्स पुरेसा नाही तर त्याच्या जोडीला लोक ज्याच्यावर आयुष्य खर्च करतात असा कोर्स मी allied कोर्स म्हणून करायला लागलो. त्याचे फायदे मला जाणवले आणि आजही मला वाटते सी.ए. पेक्षा  ICWA च्या कोर्सला जास्त महत्त्व आहे. याचे कारण या कोर्समधून analytical abilities विकसित होतात. निर्णय घेण्याची वृत्ती सी.ए. पेक्षा ICWA च्या कोर्समधून विकसित होते. मी एकापाठोपाठ एक कोर्स करू शकलो कारण त्याचे नियोजन कायम ठरलेले असायचे. ICWA ची परीक्षा ही नेहमी १ जूनला असायची आणि सी.ए.ची परीक्षा कायम १ मेला असायची असे वर्षानुवर्षं कायम आहे. मी सी.ए. ची परीक्षा द्यायचो आणि पुढच्या तीन आठवड्यात अभ्यास करून ICWA ची परीक्षा द्यायचो असे करण्याचा मला उपयोग झाला. कुठल्याही गोष्टीची cost आणि analysis सी.ए.ला कळत नाही त्यासाठी ICWA असायला लागते असे मी आज बँकेतपण सांगतो.

**कॉसमॉसची आव्हाने पेलत पुढचे पाऊल**




**RBI च्या Effective Crisis Management पुरस्काराने सन्मानित**

पाच वर्षांपूर्वी ज्यावेळेला कॉसमॉस बँकेची जबाबदारी माझ्यावर आली त्यावेळेला बँकेवर रन आलेला होता. रन आलेला ह्याचा अर्थ असा की डिपॉझिटर पैसे काढू लागलेले होते. पुण्यामधील रोजरी स्कूलने आमचे पन्नास कोटी रुपये डुबवले आणि त्याच्या बातम्या सर्व टीव्ही आणि वृतपत्रांवर झळकल्यानंतर बँक आता बंद पडणार ह्या भीतीने लोकांच्या पैसे काढायला रांगा लागल्या होत्या. महिनाभर आमच्या बँकेच्या तत्कालिक चेअरमन यांनी कारभार सांभाळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मात्र जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जायला लागली तेव्हा सर्व बारा जणांच्या संचालक मंडळाने मला नियुक्त केले. दहा महिने आधी झालेल्या निवडणुकीमध्ये माझे दहा सदस्य निवडून आले होते आणि मी एका मताने पडलेलो होतो. तरीसुद्धा मला चेअरमन पदावर नियुक्त केले. आत्ताच्या परिस्थितीमध्ये कोण सगळ्यात जास्त चांगल्या प्रकारे हे हाताळू शकेल तर मिलिंद काळेच असे म्हणून त्यांनी माझ्यावर जबाबदारी सोपवली. त्या परिस्थितीत बँक सावरली आणि पुन्हा वर्षभरात डिपॉझिट त्याच स्तरावर आणून ठेवायला आम्ही खूप प्रयत्न केले. अधिकाऱ्यांचे खच्चीकरण झालेले होते, स्टाफ खचला होता, स्टाफचे ॲग्रीमेंट त्यावेळी होऊ शकत नव्हते, पैशाची गळती लागलेली होती, बँकेचे गुडविल गेलेले होते अशा अवघड परिस्थितीमध्ये माझ्यावर जबाबदारी आली आणि मी ती समर्थपणे पेलली. माझ्यावर जबाबदारी आल्यावरच बँकेला का अडचणी येणार होत्या आणि नियतीला मला कसं आणि किती वेळेला तपासायचे होते हे मला माहीत नाही. पूर्ण आशिया खंडातला आणि भारतीय बँकिंग क्षेत्रातील शंभर वर्षातील सर्वात मोठा १०० कोटींचा सायबर हल्ला कॉसमॉस बँकेवर झाला. त्या हल्ल्याला सुद्धा मलाच सामोरं जायला लागलं. सर्व मीडिया आणि संपूर्ण बँकिंग क्षेत्र अक्षरश: हादरलेले होते. केवळ तीन तासांमध्ये १०० कोटी रुपये रशिया, अमेरिका, कॅनेडा आणि भारत अशा वेगवेगळ्या देशांतून सायबर हल्ल्यात गेले. त्या हल्ल्याचा अंदाज कुणालाच नव्हता आणि अशा प्रसंगात national security council आणि RBI आमच्या सोबत उभी राहीली. पण जी परिस्थिती सांभाळून न्यायची होती आणि खंबीरपणे हाताळायची होती ती माझ्यावर आली. तीन तासात १०० कोटी रुपयांचा निव्वळ तोटा होणं ह्याचा अर्थ कॉसमॉस बँक बुडाली. अशा परिस्थितीत आमचे सर्व संचालक घाबरलेले असताना पुन्हा सगळे उभे करणे, पुन्हा बळकट करणे, त्यासाठी योजना आखून त्यानुसार खर्च करणे आणि गेलेले सर्व १०० कोटी रुपये RBI ला परत करणे ह्यासाठी अपवादात्मक स्थिती म्हणून आम्ही RBI कडे दोन वर्षांची मुदत मागितली आणि दोन वर्षांत ते पुन्हा write off करून त्यातूनही बाहेर आलो. दिडच वर्षांत बँक कोसळली अशी दुसऱ्यांदा परिस्थिती आलेली असताना मी ती जबाबदारी घेतलेली होती. त्यानंतर पुन्हा मी एक नवीन प्रयोग केला. डिसेंबर महिन्यात जेंव्हा निवडणूक होती त्यावेळेला सहकार क्षेत्रातील एक अजब मी केले. बँक हा विश्वासाचा विषय असतो आणि ज्या संचालक मंडळावर विश्वास असतो तेच संचालक मंडळ कायम निवडून येते. सर्वसाधारण प्रथेप्रमाणे जे प्रस्थापित असतात आणि सिटिंग चेअरमन असतात तेच पुन्हा निवडून येतात. एखादा गट बाहेर पडला किंवा एखादा कर्तुत्ववान नाव असलेला संचालक बाहेर पडला तरच एखाद-दूसरा जण नवीन निवडून येतो अन्यथा प्रस्थापित पॅनलच पुन्हा निवडून येतं. असा मुंबईतला, पश्चिम महाराष्ट्रातला आणि भारतातला एखादा अपवाद सोडता सर्व बँकांचा अनुभव आहे. **हे सांगण्याचे वैशिष्ट्य असे आहे, की मला प्रबोधिनीने जे घडवले, शिकवले आणि नेतृत्वगुण दिले त्याचा मला उपयोग झाला. लोकांची पारख करून निवडण्याचा मला उपयोग झाला. या वेळेला मी माझ्या सर्व जुन्या सहकाऱ्यांना सांगितले, मी जर बँकेत असेन तर ह्या चार वर्षांच्या काळामध्ये आपल्या बँकेच्या संचालक मंडळात मूलभूत बदल करण्याची गरज आहे. त्यासाठी मला नवीन, तरुण इंजीनियर, प्रोफेशनल सी.ए. असे लोक लागतील आणि त्याचा succession plan लागेल. हे गेल्या दहा-पंधरा वर्षात आपल्याकडे झालेले नाही म्हणून मला ते करायचे आहे. माझे मत आपल्याला पटणार नाही म्हणून तुम्ही बारा जण वेगळे आहात आणि मी एकटा वेगळा आहे. गैरसमज नको म्हणून खुलासा करतो की मी तुमच्या बरोबर निवडणूक न लढवता माझा मी एकटा निवडणूक लढवणार आहे!**

कॉसमॉस बँक ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सहकारी बँक आहे. तिचा विस्तार सात राज्यात; विजयवाडा, कच्छ, चेन्नई, मुंबई, नागपूर, इंदूर आणि हैद्राबाद अशा सगळ्या ठिकाणी आहे. तिथून आणि मुंबई पुण्यातून ह्या निवडणुकीत मतदान होते. हे मतदान होत असताना मला जो एक महिन्याचा काळ मिळाला त्याच्यामध्ये मी माझ्या दोन जुन्या आणि ज्येष्ठ



**कॉसमॉस बँक नवीन पॅनल**

संचालकांना बरोबर घेतले. हे युद्ध प्रस्थापितांविरुद्ध होते, त्यांनी बँक नक्कीच मोठी केली होती पण आत्ताच्या काळात त्यांच्या गरजा, क्षमता आणि विचार हे उपयोगी नव्हते. अशावेळेला बदल पाहिजे म्हणून तो बदल करायला जी हिम्मत करायला लागते ती मी दाखवली. उर्वरित बारा पैकी डॉ. मुकुंद अभ्यंकर वय वर्षे ८३ आणि ॲड. प्रल्हाद कोकरे वय वर्ष ७९ अशा दोन ज्येष्ठांना घरातील आई-वडिलांप्रमाणे मार्गदर्शनासाठी म्हणून विचारले, की ह्या स्वतंत्र विचाराने चालणार आहे आणि तुम्ही माझ्याबरोबर आलेलं मला आवडेल. त्या दोघांनी जुने संचालक मंडळ सोडले आणि माझ्या बाजूला आले. **ही संपूर्ण निवडणूक वर्षानुवर्षे प्रस्थापित असणाऱ्यांचे पॅनल विरुद्ध मिलिंद काळेंचे नवोदितांचे पॅनल अशी झाली आणि संपूर्ण विरोधाचे वातावरण असताना ते पूर्णपणे ढवळून काढून आम्ही तेरापैकी तेरा संचालक पूर्ण बहुमताने सात राज्यांमधून निवडून आलो.** मी ज्या लोकांना निवडले होते त्यामध्ये माझ्यासह नवीन तीन असे एकूण चार सी.ए., चार इंजीनियर आणि तरुण युवक सोबत घेऊन मी ही निवडणूक लढवली. ह्या सगळ्यात माझे प्रबोधिनीतील सहकारी, आर्थिक उलढालींबद्दलचे उत्तम लेखक, नामवंत पत्रकार नंदकुमार काकीर्डे जे आप्पांचे स्वीय सचिव होते ते माझे प्रबोधिनीतील सहकारी, मी ह्या तेरा सहकाऱ्यांमध्ये घेतले आहेत. अशा संपूर्ण नव्या गटासोबत गेल्या ५० वर्षांत सहकारी बँकांच्या इतिहासात जे झाले नाही ते करून दाखवले. नेतृत्व, खंबीरपणा, सगळ्यांनी साथ सोडली तर मी एकटा जाईन, माझे ध्येय निश्चित समोर आहे आणि त्याकरता आपल्या साथीदारांची युक्तीने निवड करणे, त्यांना कामाचे वाटप करणे आणि त्यांच्याकडून ते काम योग्य रीतीने करून घेणे हे सगळं मी त्या महिन्याभरात वापरले, ते मला प्रबोधिनीकडून मिळालेले आहे.

## स्पर्धा नाही तर संघटन

सहकारी क्षेत्रातील कित्येक लोकांनी नंतर मला विचारले की एवढ्या कमी काळामध्ये तुम्ही इतकी प्रचंड उलथापालथ आणि मोठे बदल कसे करू शकलात हे आम्हाला सांगा. त्यावर सहकार क्षेत्राला आज कशाची गरज आहे यावर मी व्याख्याने दिली आहेत. आज जिथे-जिथे सहकार क्षेत्रात असे प्रस्थापित मंडळ उचलून फेकायचे आहे तिथे-तिथे हे तंत्र मी तुम्हाला देईन असे सांगतो. मी कुणी मोठा राजकारणी किंवा कुठल्याही पक्षाचा माणूस नाही. पण लोकांची गरज, चांगल्या नवीन सहकाऱ्यांची निवड ह्यासाठी तुमच्याकरता आणि सहकार क्षेत्राकरता मी हे निवडणूक तंत्र इतरांना देईन असे सांगितले. **गेल्या चार वर्षांत मी मुंबई-पुणे सारख्या सहकार क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात लोकांना एकत्र आणण्याचे काम केलेलं आहे. आमच्या ज्या पहिल्या नऊ-दहा बँका आहेत त्या एकमेकांनाच स्पर्धक समजायच्या आणि अनेक जण एकमेकांशी संवाद साधत नव्हते एकमेकांसोबत आपले म्हणणे, आपल्या कल्पना सांगत नव्हते. मात्र ह्या निवडणुकीमध्ये मला मुंबईच्या सर्व बँका आणि पदाधिकारी यांनी मदत केली. मी त्यांचा स्पर्धक असून, नवोदित असून तसेच त्यांच्यासमोर आव्हान असून त्यांनी मला एक व्यक्ती म्हणून मदत केली, एक विचार म्हणून आणि सहकारातील एक नवीन चेहरा म्हणून मदत केली. त्यामागे देखील मी नेहमी विचार करत आलो आहे की आम्ही एक संघटना बांधत आहोत. त्यानुसार आम्ही सहकारी क्षेत्रातील चार्टर्ड अकाऊंटंट लोकांची एक CAs in Co-operative Banking (CACOB) अशी एक संस्था तयार केली आणि त्यामध्ये मला माझ्या सी.ए. क्षेत्रातील माझे शिक्षक शिवाजी झावरे सरांची मोलाची मदत आणि मार्गदर्शन मिळाले. झावरे सर बँकर नाहीत मात्र ते, सारस्वत बँकेचे एकेकाळचे अध्यक्ष होते.** कॅबिनेट मंत्री सुरेश प्रभू अध्यक्ष आणि मी उपाध्यक्ष आहे.



**केन्द्रीय मंत्री मा. सुरेश प्रभू यांच्या बरोबर**

आम्ही बँकिंग क्षेत्रातील संस्कृती बदलू इच्छित आहे त्या करता नेटवर्किंग म्हणून आम्ही काम उभे करत आहोत. अनेक सहकारी बँका या राजकीय पक्षांशी जोडलेल्या असतात. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, डावे अशा सर्व विचारांच्या बँका देशभरात आहेत पण या सर्वांना एकत्र घेऊन एक विचार म्हणून सहकार क्षेत्राला पुढे नेण्यासाठी काय केले पाहिजे ह्याची नाळ आपल्याला कळली आहे. मुंबईतील सहकार क्षेत्रातील मोठ्या बँकांशी त्यानिमित्ताने मी संवाद सुरू केला आहे. मला वाटते सगळ्यांना

बरोबर घेऊन जाण्याची आणि जे चूक आहे त्याला ठामपणे विरोध करण्याची क्षमता असणारी ही नेतृत्वपद्धती मला आप्पांनी दिली. मी शंभर ठिकाणी हे सांगतो की प्रबोधिनीने मला घडवले त्यामुळे मी हे साहस करू शकतोय. ह्या सगळ्या यशामध्ये Against all odds वर काम करणे आणि तरी सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे मला जमू शकले. माझ्या मंडळातील दहा नवीन जणांना प्रत्येकाला एकेका विषयाची जबाबदारी देऊन, त्यांना पुढाकार देऊन मी त्यांना तयार करतोय आणि सांगतोय की अजून साडे चार वर्षांनंतर मी चेअरमन असणार नाही आणि पुढचा चेअरमन हा तुमच्या मधून निवडायचा आहे म्हणून तुम्ही कामे करा. पुढचा नेता तयार करणे आणि आधी उल्लेख केला त्याप्रमाणे succession plan करून नवीन संस्थात्मक बदल घडवून आणताना मला प्रबोधिनीच्या शिक्षणाचा निश्चितच उपयोग झाला आहे.

माझ्या वर्गातले सहकारी त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रातील मला उपयुक्त असलेले विचार आणि माझे त्यांच्यासाठीचे उपयुक्त असे विचार अशा सर्व चर्चा आमच्या अजूनही चालतात. बँकेतील परिस्थिती, दीनानाथ मधील परिस्थिती, KPIT मधील परिस्थिती, लष्करातील अनुभव, वैयक्तिक अनुभव असे एकमेकांना सांगत आम्ही एकत्र समृद्ध होत राहतो. मला वाटतं आमच्या वर्गाची ही जशी घट्ट टीम तयार झाली तशी पुढे काही वर्गांची झाली नाही आणि तिथे प्रबोधिनी म्हणून आपण कुठेतरी कमी पडलो आहोत. शालेय शिक्षण झाल्यानंतर ज्या वेळी प्रोफेशनल करिअर करतो त्यावेळी आपण थोडेसे दूरावतो आणि पुन्हा १५-२० वर्षांच्या काळाने एकत्र येतो असे दिसते मात्र आम्ही वर्गमित्र कायम संपूर्ण वाटेवर एकत्र राहिलो त्यामुळे कौटुंबिक जिव्हाळ्या सोबत साथ, मदत, मार्गदर्शन आणि एक चांगली स्पर्धा आमच्यामध्ये राहिली. संजीवनी हॉस्पिटल आणि नंतर दीनानाथच्या उभारणीत वापरलेलं हे business model बँकांना कसे पटवायचे, त्यांना तयार करायचे आणि कसे पुढे करायचे हे सांगण्यात माझा सक्रीय सहभाग होता. आम्ही सगळ्या मित्रांनी कायम एकमेकांना सहकार्य केल्याने आम्ही सगळे आपआपल्या क्षेत्रात चांगले काम करू शकलो आहोत. केवळ बालपणीच्या आठवणीच नाही तर ज्यावेळी आपण खरेच बाहेरचे जग बघायला लागत असतो त्या वेळेलासुद्धा प्रबोधिनीच्या आपल्या सहकाऱ्यांचा एक गट असणे आवश्यक आहे असे मला वाटते. आता त्यादृष्टीने नवीन प्रबोधक पुन्हा चांगले प्रयत्न करत आहेत.

प्रत्येकाची जी काही वैयक्तिक, सामाजिक किंवा प्रोफेशनल वाढ झाली आहे त्यामध्ये वय वर्षे ३०-४० या वयात समविचारी लोकांचा गट सातत्याने सोबत असणे हे प्रत्येकाला, सगळ्यांना, प्रबोधिनीलापण जास्त हितकारक आणि उपयोगाचे राहील. आपण जी कार्यक्षेत्रे निवडू तिथे आपल्याला त्याचा उपयोग होईल. मी अगदी छोटे उदाहरण सांगतो की सुदर्शन हसबनीस यांना मी गमतीत एकदा विचारले, तू फील्डवर किती वेळा जातोस? तेंव्हा त्याने सांगितले आम्ही कितीही उच्चस्तरीय अधिकारी असलो तरी आम्हाला फील्ड वर जायलाच लागते आणि त्याचेसुद्धा आमचे रोटेशनल शेड्यूल असते. कारण फील्ड वरची परिस्थिती पाहून त्यावर लगेच निर्णय घेणं, मॉरल तयार करण्यासाठी आम्हाला फील्डवर जावेच लागते. आज मला बँकिंग क्षेत्रात त्याचा उपयोग होतो. आत्ताचे लोक असे म्हणतात, की माझ्या आधीचे कुठलेच चेअरमन एव्हढे फील्डवर उतरले नाहीत तेवढे मिलिंद काळे उतरतात. हे मला कुणी दिले तर आपल्या लष्कराची जी संस्कृती सुदर्शनने मला सांगितली ती मी बँकिंग क्षेत्रात वापरली. एसी रूम केबिनमध्ये बसून नुसते नियोजन न करता प्रत्यक्ष आघाडीवर जाऊन लढणे, लोकांसोबत राहणे, समक्ष परिस्थिती पाहून निर्णय घेणे या सगळ्याचा मला माझ्या वर्गमित्रांच्यामुळेच फायदा झाला. माझे मित्र आणि प्रबोधिनी हाच माझा ठेवा आहे!

### मार्ग शोधूनी आक्रमू

मी सी.ए. होऊन करिअरसाठी एक मार्ग निवडला आणि पुढे त्यामध्ये मला आवडेल असे एक मॉडेल उभे केले. मी एखाद्या मोठ्या संस्थेचा भाग व्हायला लागलो असतो तर मला त्याच चौकटीत राहून काम करावे लागले असते. मला माझे स्वतंत्र जगणे जमले नसते. पहिली चार-पाच वर्षे मी माझ्या दोन सी.ए. मित्रांसोबत भागीदारी देखील केली. पण एकदा योग्य वेळेला योग्य पध्दतीने मी सांगितले की मला उरलेली व्यवधाने देखील आहेत, उरलेल्या इच्छा-आकांशा देखील आहेत. तुमच्या ज्या गरजा आहेत आणि माझ्या ज्या गरजा आहेत त्या वेगळ्या आहेत आणि त्याचा वेग वेगळा आहे त्यामुळे आता आपण एकत्र भागीदारीमध्ये काम करायला नको. मी माझा स्वतंत्र व्यवसाय चालू ठेवला आणि माझे



**मटा सेमिनारमध्ये मार्गदर्शन करताना**

असोसिएट्स खूप तयार केले. त्यांच्यावर अवलंबून न राहता मला चौकट मोडायला मिळाली, मला माझ्या आकाराची संस्थात्मक बांधणी करता आली. सी.ए. प्रोफेशनमध्ये मी लौकीक अर्थाने नावारूपाला आलो नसेन पण माझे जे सर्व ध्येय होते ते साध्य करायला मला या निर्णयाची मदत झाली. मी माझ्या घरच्या अन्य व्यवसायाकडे लक्ष देऊ शकलो. त्यामधून बांधकामाचा व्यवसाय, जमिनीचा व्यवसाय या सगळ्या गोष्टींकडे लक्ष देऊ शकलो. केवळ सी.ए.च्या चौकटीत एखाद्या फर्ममध्ये काम करायला मला बंधने नव्हती पण मला ते आवडले नसते म्हणून असे करणे गैर होते असे मला वाटते. सी.ए. व्यवसायात समृद्धी (wealth building) तयार होत नाही याची मला पूर्वकल्पना होती आणि ते झालेलं नाही! कितीही म्हटलं तरी अन्य उद्योगातून जे wealth building मी करू शकलो, पूरक उद्योग उभारणे आणि त्यासाठी स्वत:वर ताण घेणे असे काम मी केले.

**मातीची ओढ – 'अविरत श्रमणे हेचि जिणे'**

मी मूळचा शेतकरी घरातील असून रत्नागिरी कोकणाचा असल्याने तिथली बाग इथे उभी करायची म्हणून मी स्वत: कष्ट करून स्वखर्चाने पानशेत जवळ २०० एकर बाग निर्माण केली. तिथे बाग लावणे, भविष्याची तरतूद करणे असे मी करत आहे. **मूळची मातीची आवड मी तोडू शकत नाही म्हणून सी.ए. होऊन २०० एकर जमीन घेऊन आंबा लावून बाग फुलवू शकलो. सी.ए.ची प्रॅक्टीस केली तरी माझ्या मनात costing जरा जास्त राहीले असे मी म्हणेन.** १९८३ सालापासून आजपर्यंत मी सी.ए.चा व्यवसाय करतो आहे. दुपारी दोन वाजेपर्यंत सी.ए.चे काम मग थोडी विश्रांती घेऊन बँकेत कामासाठी येणं असे आजही माझे नियमित सुरू आहे. शनिवारी बँक बंद झाली की माझे शेतावर काम सुरू होते आणि ते रविवारी बंद झाले की सोमवारी सी.ए.चे काम सुरू होते. या प्रकारे ३६५ दिवस काम करत राहताना असे कंपार्टमेंट करणेदेखील महत्त्वाचे असते. प्रत्येक काम मी आनंदाने झोकून देऊन करत असतो आणि माझ्या अपेक्षेप्रमाणे त्यात मला यश आले आहे. माझ्या अजूनही खूप अपेक्षा आहेत आणि खूप काम करायचे आहे. '**अविरत श्रमणे हेचि जिणे**' या पद्यातील ओळींमधला जो आनंद आहे तो मला आजही आवडतो. आपल्या आवडीचे क्षेत्र, माणसे, सगळ्यांना सोबत घेऊन जाणे आणि नेतृत्व हे पाहून मी सहकार क्षेत्राची निवड केली. माझ्या रक्तातच व्यापार, उद्योग, बँकिंग, कॉस्टिंग आणि सी.ए. असल्याने आवडीचा विषय आणि समाजकारण असा दुग्धशर्करा योग होता. अन्यथा मला असे आवडीचे काम करायला मिळाले नसते. सहकार क्षेत्रात प्रबोधिनीचे जास्त लोक गेलेले नाहीत अशा क्षेत्रात मला काम करायला मिळाले. तिथे सर्वत्र मला सगळे 'प्रबोधिनीय' म्हणूनच ओळखतात. नामवंत बँका सुद्धा 'प्रबोधिनीय' मिलिंद काळे तिथे चेअरमन आहेत असे म्हणतात! निवडणुकांमध्ये सगळ्या पक्षांचे, जातीचे, विचारांचे लोक माझ्या मागे उभे राहतात. स्पष्ट सांगायचे तर काँग्रेस, राष्ट्रवादी आणि मोतीबागेतील संघ परिवाराचे अशा सगळ्याच प्रकारचे लोक माझ्यामागे उभे राहिले. सहकार हे सर्वसमावेशक क्षेत्र आहे आणि त्यात मला माझ्या उगमाचा आणि समाजकारणाच्या शिक्षणाचा उपयोग होतो. मी असे पाहतो की माझ्या ३००० कर्मचाऱ्यांचा मी आशेचा किरण आहे की हे जर का परत निवडून आले आणि यांनी जर बँक चालवली तर आपण सुरक्षित हातात आहोत हा विश्वास सर्व सहकाऱ्यांना वाटणे यातच मला सर्व कामाचा आनंद मिळाला!

**सहविचारात्मक नेतृत्व पद्धती आपल्याकडे ज्ञान प्रबोधिनीमध्ये आहे तिचा उल्लेख मी अनेकदा बँकेतदेखील करतो. लोकं फारच सगळ्यांच्या विचाराने निर्णयाला जातात तेही चुकीचे असते आणि काही पूर्ण स्वत:च गोष्टी ठरवतात तो ही चुकीचा आहे. सहविचारात्मक नेतृत्व पद्धती हा त्यातील मध्यम मार्ग आहे आणि गेली पाच वर्षे मी तो वापरत आहे. त्याद्वारे सगळ्यांचा मी निर्णयात सहभाग करून घेतो, त्यांना टोकापर्यंत आणून ठेवतो आणि मग मुद्दा मांडून त्यांच्याकडून निर्णय मंजूर करून घेतो.** ही सहविचारात्मक नेतृत्व पद्धती जी आप्पांनी डोक्यावर थोपवली, सांगितली त्याचा नक्की उपयोग होतो. प्रामाणिकपणे मी सांगेन त्यामध्ये जरी सहविचारात्मक नेतृत्व पद्धती म्हटली तरी ही लोकशाही नव्हे! ही लोकशाही पद्धतीने चालवलेली हुकूमशाही आहे. लोकशाही आपल्याला सगळ्यांना बरोबर घेऊन जायला सांगते मात्र लोक पात्र नसतील तर हुकूमशाहीनेच गोष्टी कराव्या लागतात. मग हुकूमशाही लोकांना पटत नाही, रुचत नाही मग चांगल्या गोड शब्दात सांगणे म्हणजे त्यावेळी आप्पांनी जे सांगितले होते आणि मी आता उत्तरतो की '**ही हुकूमशाही लोकशाही पद्धतीने राबविणे याला सहविचारात्मक नेतृत्व पद्धती म्हणतात!' ही माझी व्याख्या आहे.**

**गुरुजनांनी दाखवलेल्या वाटेवर**



आ. वामनरावांनी मला प्रबोधिनीची दिशा दाखवली म्हणून मी त्यांना कधीही विसरू शकणार नाही. प्रबोधिनीत आप्पांनी दूरदृष्टी दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर आप्पांचे संपर्क होते आणि विविध उद्योग आप्पा करायचे हे पाहून दूरदृष्टी काय ते मला समजले. मला वेगळ्या विश्वात घेऊन गेलेले आणि तिथेही मला साथ देणारे वाडियाचे प्राचार्य प्राध्यापक नुलकर, सी.ए.च्या क्षेत्रात मला मार्गदर्शन करणारे सी.ए. क्षेत्रातील नामवंत शिवाजी झावरे सर, ICWA चे प्रमोद पारखी आणि मुकुंद अभ्यंकर, ज्यांचा उल्लेख मी वर केला की वयाच्या ८०व्या वर्षी निवडणूक लढवून ते मंडळावर आले. माझ्यासोबत ते आले असे न म्हणता मी त्यांच्यासोबत मंडळावर निवडून आलो असे मी म्हणेन. त्यांनीच मला वीस वर्षांपूर्वी कॉसमॉस मध्ये RBI ने सक्ती करण्यापूर्वीच सी.ए. म्हणून घेतले होते. सहकाऱ्यांमध्ये मोहनराव, विकु सर असे अनेक सहकारी आणि वर्गमित्र माझे गुरुतुल्य आहेत आणि त्यांची सगळीच नावे इथे घेणे शक्य होणार नाही. पण ह्या सर्वांसोबतच मी घडलो.

आमची तुकडी ही सातत्याने आप्पांच्या सहवासात राहिलेली म्हणता येईल. आमच्या तुकडीने एक Collective नाव कमावलं आणि आजही आम्ही सर्व मित्र एकत्र आहोत आणि वेळेला एकमेकांच्या पाठीशी उभे राहतो. प्रबोधक म्हणून आजच्या पिढीनेही हा connect जोपासावा. **आपण सगळेच विचारवंत आहोत तर केवळ आर्थिक किम्मत न मोजता उभे राहणारे सर्वात मोठे भांडवल बुद्धी हे आहे. आता चाळीस वर्षांनी आपण वेगवेगळ्या अडचणीत आणि विकासाच्या मार्गावर असलेल्या लोकांना मदत, सल्ला आणि मार्गदर्शन करण्याचे आपण काम करू या असे मी कॉमर्समधील मित्रांना आवाहन केलेलं आहे. प्रबोधिनीच्या आर्थिक आणि उद्योजक दृष्टीने अर्थनिर्मितीसाठी एक मॉडेल उभे करू या असे मॉडेल मी सुचवले आहे आणि त्यावर आम्ही आता काम करत आहोत. योग्यवेळी योग्य मार्गदर्शनासाठी विश्वासार्ह नाव म्हणून ज्ञान प्रबोधिनी हा मंच आपण तयार करू या. नवीन प्रबोधकांनी यात सहभाग घ्यावा आणि आमच्या अनुभवाची साथ तुमच्या सोबत राहीलच असे मी आर्थिक क्षेत्रातल्या सगळ्यांना सांगेन. शाश्वत आणि स्वावलंबी आर्थिक रचना प्रबोधिनीसाठी करण्यासाठी आपण एकत्र येऊन fee based income मधून निर्माण करू शकू असा विश्वास वाटतो!**





**कॉसमॉसच्या नवीन शाखांचं उद्घाटन करताना**

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- दीवार
२. आवडते पुस्तक - नाझी भस्मासुराचा उदयास्त
३. आवडता अर्थतज्ज्ञ- रघुराम राजन
४. तुमचा छंद /आवड - Cycling

**पहिली प्रतिक्रिया**

१. पैसा- गरजेची गोष्ट. खूप मोठी गोष्ट नाही, जसे कपडे लागतात तसेच पैसे लागतात असे मला म्हणायचे आहे
२. बँक- ज्यांना पैसे ठेवायचे आहेत आणि गरज आहेत अशा सगळ्याचं money market
३. Vision - जे घडवता येत नाही पण विचार करता येते अशी सोपी गोष्ट
४. आप्पा पेंडसे- Visionary
५. ज्ञान प्रबोधिनी- ज्ञानाचे प्रबोधन

पुन्हा एकदा जर आयुष्य नव्याने जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल?

- क्रीडाक्षेत्रात organiser म्हणून आपल्या देशाचं नाव उंचवायला आवडेल. या क्षेत्रात आपल्याकडे गुणवंत खेळाडू आहेत मात्र ते संघटित करण्यात आम्ही मागे पडतो त्यावर काम करायला नक्की आवडेल.

**मिलिंद काळे**
9011070024
camilindkale@yahoo.com

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org